# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग(मुख्यालय)

जा.क्र.भिनिशमनपा./घनकचरा/ १३८९ /२५
दि. ०८/१०/२०२५

प्रति,
संगणक विभाग प्रमुख
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,
भिवंडी

**विषय :- कोटेशन नोटीस प्रसिध्द करणे बाबत.**

**संदर्भ :- मा.आयुक्त सो. यांची दि.१३/०८/२०२५ रोजीची मान्यता**

वरिल विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील साचलेला कचरा गोळा करणेसाठी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२५-२०२६ अंतर्गत भिवंडी पुर्व विधानसभा मतदार संघात विविध ठिकाणी १२० लिटर क्षमतेचे दोन चाके असलेले २७६ नग फायबर कचरा कुंड्या उपलब्ध होणे कामी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१३/०८/२०२५ रोजी मान्यता दिली आहे.

त्यानुसार सोबत जोडलेले कोटेशन नोटीस मनपा संकेत स्थळावर प्रसिध्द करुन तसा अहवाल घनकचरा विभागात सादर करावा.

(विक्रम दराडे)
उप-आयुक्त (घनकचरा)
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,घनकचरा विभाग (मुख्यालय)

## कोटेशन मागविणेची नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका आरोग्य व स्वच्छता विभागाकरिता खालील कामाकरिता दि.०८/१०/२०२५ ते दि.१५/१० /२०२५ रोजी दुपारी १.०० वाजे पर्यंत कोटेशन मागविण्यात येत आहेत.कामाबाबतची संपुर्ण माहिती आरोग्य विभागाकडून घेऊनच कोटेशन भरावीत.नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करासहीत व खर्चासहीत भरावीत तद्‌नंतर कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही.कमी किंवा जास्त दराचे कोटेशन मंजुर अथवा नामंजुर करणे अगर सर्वच कोटेशन नाकारणेचा अधिकार मा.आयुक्त सो. यांनी राखुन ठेवला आहे.उशीरा आलेले कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारले जाणार नाहीत.

---

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील साचलेला कचरा गोळा करणेसाठी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२५-२०२६ अंतर्गत भिवंडी पुर्व विधानसभा मतदार संघात विविध ठिकाणी १२० लिटर क्षमतेचे दोन चाके असलेले २७६ नग फायबर कचरा कुंड्या उपलब्ध होणे कामी अंदाजपत्रकिय रक्कम रु.९,९६,३६०/- इतकी आहे. यासाठी इच्छुक ठेकेदार किंवा पुरवठाधारक यांचे कडुन खालील प्रमाणे दस्ताऐवज जोडणे बंधनकारक आहे.

१) संबधित संस्थेचे पॅनकॉर्ड
२) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
३) व्यवसाय कर
४) खरेदी प्राधिका-या बरोबर हितसंबंधचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल दरपत्रक देण्या बाबतचे हमीपत्र
५) ईपीएफ नोंदणी प्रमाणपत्र.
६) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात आयकर भरल्याचे प्रमाणपत्र
७) महसुल कर (घरपट्टी पावती)
८) जीएसटी नोदणी क्रंमाक

वरिल आवश्यक दस्तऐवज बंद लिफाफ्यात दरपत्रक कालावधीत घनकचरा विभाग येथे सादर करावे तसेच आवश्यक असलेली १२० लिटर क्षमतेची दोनचाकी असलेले फायबर कचरा कुंडीचे स्पेसिफिकेशन खालील प्रमाणे आहे.

LTR DUSTBIN SPECIFICATION ,

| | |
|---|---|
| Approx volume (ltrs) | - 120 |
| Articles weight (kgs): | - 7.5 |
| Useful load (kgs): | - 60 |
| Overall height (mm): | - 980 |
| Overall width (mm): | - 490 |
| Over depth (mm): | -550 |
| Upper edge (mm) | - 910 |
| Wheel dia (0) (mm)- | - 200 |
| Wheel to wheel distance (mm) | - 470 |

तरी वरिल स्पेसिफिकेशन नुसार आवश्यक असलेले १२० लि.क्षमतेचे दोन चाकी फायबर कचरा कुंडी पुरविणेसाठी कंपनी किंवा इच्छुक पुरवठाधारक यांनी दरपत्रके सर्व करासह व खर्चासह स्पष्ट लिहुन आरोग्य विभाग येथे सादर करावेत.

उप-आयुक्त (घनकचरा)
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

---

खालील ठिकाणी प्रसिद्ध केली .

१) मनपा मुख्यालय कार्यालय नोटीस बोर्ड
२) कोंडवाडा नोटीस बोर्ड
३) मनपा संकेतस्थळ